ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– IV July - August 2021

# शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या समायोजन क्षमतेसंदर्भातील सद्यःस्थितीचा अभ्यास

**सहा. प्रा. शालिनी संतोष टोणपे**

*संशोधक विद्यार्थी*

*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे*

**मार्गदर्शक**

**डॉ. नेहा नितीन देव**

व्यक्ती आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी भोवतालच्या परिस्थितीत बदल करण्याचा प्रयत्न करते व वातावरणातील जुळवून घेवून परिस्थितीची चांगले नाते निर्माण करण्याचा प्रयत्न करते.

शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या दृष्टीने विचार केला तर बी.एड्. प्रशिक्षणासाठी काही प्रशिक्षणार्थी इतर जिल्ह्यांतून पुण्यात आलेले असतात. त्यांना परिस्थितीशी समायोजन साधताना बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागते. वसतिगृहात राहणे, बाहेरचे जेवण, पुण्यातील वातावरण या सर्वांशी जुळवून घेणे सहज शक्य होत नाही आणि त्यामुळेच ताण येतो व समायोजनाची समस्या जाणवते.

Mental Health is one of the components of the broad concept of health. It is concerned with an optimum level of emotional and behavioral adjustment of the individual. (Husain, 2016, P.363)

**मुख्य संकल्पना :** शिक्षक प्रशिक्षणार्थी, समायोजन क्षमता

*Aarhat Publication & Aarhat Journals is licensed Based on a work at http://www.aarhat.com/amierj/*

## प्रस्तावना

"Adjustment is not a simple term like adaptation or accommodation. It is actually a condition or state of mind and behavior in which one feels that one's needs have been, or will be gratified. The satisfaction of these needs, however, must lie within the framework and requirements of one's culture and society. As long as this happens, the individual remains adjusted; failing this, he may drift towards maladaptation and mental illness." (Mangal, 2012, P. 506)

अशा प्रकारे समायोजन न साधता येणे हे ताणास कारणीभूत ठरते.

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–X, Issues– IV July - August 2021


**समायोजन क्षमता :**

समायोजनाचा एका शब्दात अर्थ सांगावयाचा झाल्यास 'जुळवाजुळव' असा सांगता येईल. 'स्व' ची ही भोवतालच्या परिस्थितीशी केलेली जुळवा जुळव आहे. (करंदीकर, २०११, पृ.१५४)

''परिस्थितीशी जुळवून घेणे म्हणजे समायोजन होय.'' (चव्हाण, २००९, पृ.१३१)

''परिस्थितीच्या निकडीप्रमाणे मनुष्याच्या वर्तनात बदल घडून येणे म्हणजेच समायोजन होय.'' (पंडित, २००७, पृ.४८८)

**समायोजन क्षमतेचे पैलू**




**समायोजन क्षमतेचे मानवी जीवनातील महत्त्व**

A mentally healthy person is one who has a balanced personality, free from schism and inconsistencies, emotional and nervous tension, discords and conflicts. A well-adjusted person can deal with his potentialities as well as he can accept his limitations. (Husain, 2016, P. 363). एक समायोजित व्यक्ती तिच्या क्षमता ओळखून असते व तिच्या मर्यादांचीही जाणीव तिला असते. संतुलित व्यक्तिमत्व असलेली व्यक्तीच मानसिकदृष्ट्या स्वस्थ असते. जी चिंता, भावनिक अस्थिरता, मतभेद व वाद यांपासून दूर असते.

**संशोधन समस्याः**

शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या समायोजन क्षमतेसंदर्भातील सद्यःस्थितीचा अभ्यास

**समस्येचे स्पष्टीकरणः**

पुणे शहरातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न इंग्रजी माध्यमातील शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या समायोजन क्षमतेसंदर्भातील सद्यःस्थितीचा अभ्यास करणे.

**कार्यात्मक व्याख्याः**

- **शिक्षक प्रशिक्षणार्थी :**

  कला, वाणिज्य, शास्त्र व एन.सी.टी.ई ने बी.एड्. प्रवेशासाठी मान्य केलेल्या कोणत्याही विद्याशाखेचे पदवीधर असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी.

- **समायोजन क्षमता :**

  R.K. Ojha यांच्या "Bell's Adjustment Inventory for College Students' या मानसशास्त्रीय चाचणीद्वारे शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या संदर्भात मिळालेले प्राप्तांक

**संशोधनाची उद्दिष्टेः**

१) शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या समायोजन क्षमतेचे सर्वेक्षण करणे.

२) शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचे त्यांच्या समायोजन क्षमतेनुसार वर्गीकरण करणे.

**सर्वेक्षणासाठी महाविद्यालयांची निवड :**

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षणासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला आहे. पुणे विद्यापीठांतर्गत इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील दोन महाविद्यालयांची (१९४ शिक्षक प्रशिक्षणार्थी ) निवड यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली.

**प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलनाची साधने :**

सदर संशोधनासाठी खालील माहिती संकलन साधने वापरण्यात आली.

Bell's Adjustment Inventory (BAI)

**संख्याशास्त्रीय साधने :**

**शेकडेवारी :**

प्रस्तुत संशोधनात उद्दिष्टांमध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचे समायोजन क्षमतेनुसार वर्गीकरण

करण्यासाठी शेकडेवारीचा उपयोग केला गेला आहे.

**समायोजन क्षमता मापन चाचणीद्वारे संकलित माहितीचे विश्लेषण**


उद्दिष्ट क्र.२ शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचे त्यांच्या समायोजन क्षमतेनुसार वर्गीकरण करणे.

**शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र. १**

**कोष्टक क्र.१ : शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र.१ (BAI) शेकडेवारी**

| महाविद्यालय क्रमांक १ (BAI) शेकड्वारी | | | | |
|---|---|---|---|---|
| | घर | आरोग्य | सामाजिक | भावनिक |
| उत्कृष्ट | ७.३७ | ० | २.११ | १.०५ |
| चांगली | २२.११ | ७.३७ | १३.६८ | ४.२१ |
| सामान्य | ४९.४७ | ५१.५८ | ४३.१६ | ४९.४७ |
| असमाधानकारक | ११.५८ | २२.११ | २२.११ | २१.०५ |
| अतिअसमाधानकारक | ९.४७ | १८.९५ | १८.९५ | २४.२१ |

आलेख **क्र.१ :** शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र.१ **(BAI)** शेकडेवारी




**निरीक्षण :**

कोष्टक क्रमांक १ व आलेख क्रमांक १ नुसारशिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र.१ मधील शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–X, Issues– IV July - August 2021

समायोजन क्षमतेच्या प्रमाणाचे निरीक्षण केल्यास असे दिसून येते की,

- एकूण ७.३७% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची घरासंदर्भातील समायोजन क्षमता उत्कृष्ट दर्जाची २२.११% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची समायोजन क्षमता चांगली, ४९.४७% प्रशिक्षणार्थ्यांची सामान्य, ११.५८% प्रशिक्षणार्थ्यांची असमाधानकारक तर ९.४७% प्रशिक्षणार्थ्यांची अतिअसमाधानकारक आहे.
- एकूण ७.३७% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची आरोग्य संदर्भातील समायोजन क्षमता चांगली, ५१.५८% प्रशिक्षणार्थ्यांची सामान्य, २२.११% प्रशिक्षणार्थ्यांची असमाधानकारक व १८.९५% प्रशिक्षणार्थ्यांची अतिसमाधानकारक आहे.
- एकूण २.११% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची सामाजिक समायोजन क्षमता उत्कृष्ट, १३.६८% प्रशिक्षणार्थ्यांची चांगली, ४३.१६% प्रशिक्षणार्थ्यांची सामान्य, २२.११% प्रशिक्षणार्थ्यांची असमाधानकारक व १८.९५% प्रशिक्षणार्थ्यांची अतिअसमाधानकारक आहे.
- एकूण शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांपैकी १.०५% प्रशिक्षणार्थ्यांची भावनिक समायोजन क्षमता उत्कृष्ट, ४.१९% प्रशिक्षणार्थ्यांची चांगली, ४९.४७% प्रशिक्षणार्थ्यांची सामान्य २१.०५% प्रशिक्षणार्थ्यांची असमाधानकारक व २४.२१% प्रशिक्षणार्थ्यांची अतिअसमाधानकारक आहे.

**शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र. २**

**कोष्टक क्र.२ : शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र. २ (BAI) शेकडेवारी**


| महाविद्यालय क्रमांक २ (BAI) शेकडेवारी | | | | |
|---|---|---|---|---|
| | **घर** | **आरोग्य** | **सामाजिक** | **भावनिक** |
| **उत्कृष्ट** | ३.२३ | १.०७५ | २.१५ | ०.०० |
| **चांगली** | १२.९० | १.०८ | ३८.७१ | ०.०० |
| **सामान्य** | ८०.६५ | ४४.०९ | ३९.७८ | ७३.१२ |
| **असमाधानकारक** | १.०८ | ४६.२४ | १२.९० | १३.९८ |
| **अतिअसमाधानकारक** | २.१५ | ७.५३ | ६.४५ | १२.९० |

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– IV July - August 2021

### आलेख क्र. २ : शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र. २ (BAI) शेकडेवारी




- **निरीक्षण :**

कोष्टक क्रमांक २ व आलेख क्रमांक २ नुसार

अरिहंत शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या समायोजन क्षमतेच्या प्रमाणाचे निरीक्षण केल्यास असे दिसून येते की,

- एकूण ७.१४% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची घरासंदर्भातील समायोजन क्षमता उत्कृष्ट दर्जाची, १५.३१% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची समायोजन क्षमता चांगली, ५८.१६% प्रशिक्षणार्थ्यांची सामान्य, १०.२०% प्रशिक्षणार्थ्यांची असमाधानकारक तर ९.१८% प्रशिक्षणार्थ्यांची अतिअसमाधानकारक आहे.
- एकूण ३.०६% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची आरोग्य संदर्भातील समायोजन क्षमता उत्कृष्ट, ३.०६% प्रशिक्षणार्थ्यांची चांगली, ४५.९२% प्रशिक्षणार्थ्यांची सामान्य, १७.३५% प्रशिक्षणार्थ्यांची असमाधानकारक व ४५.९२% प्रशिक्षणार्थ्यांची अतिअसमाधानकारक आहे.
- एकूण २.०४% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची सामाजिक समायोजन क्षमता उत्कृष्ट, १३.३१% प्रशिक्षणार्थ्यांची चांगली, ५५.१०% प्रशिक्षणार्थ्यांची सामान्य, १७.३५% प्रशिक्षणार्थ्यांची असमाधानकारक व १०.२०%

प्रशिक्षणार्थ्यांची अतिअसमाधानकारक आहे.

- एकूण ५.१०% शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची भावनिक समायोजन क्षमता चांगली, ५१.०२% प्रशिक्षणार्थ्यांची सामान्य,१९.३९% प्रशिक्षणार्थ्यांची असमाधानकारक, २४.४९% प्रशिक्षणार्थ्यांची अतिअसमाधानकारक आहे.

## सदर संशोधनाचे योगदान

सदर संशोधनात शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या समायोजन क्षमतेसंदर्भातील सद्यःस्थितीचा अभ्यास केला आहे. या अभ्यासाद्वारे हे दिसून आले की, चारही घटकांसंदर्भात क्षमायोजन क्षमता, सामान्य, असमाधानकारक व अतिअसमाधानकारक असणारे शिक्षक प्रशिक्षणार्थी अधिक आहेत. जीवनामध्ये समायोजन क्षमतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सद्यःस्थिती लक्षात घेऊनच उपाययोजना केल्या जावू शकतात. यादृष्टीने सदर संशोधनाचे महत्त्व अधिक आहे. शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची समायोजन क्षमता विकसित व्हावी यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांना त्या संदर्भात मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. हे सदर संशोधनातील अभ्यासामुळे निदर्शनास आले.

## शिफारशी:

- **शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी शिफारशी**

१) शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची समायोजन क्षमता विकसित व्हावी यासाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करावे. (उद्दिष्ट क्र.२ नुसार निष्कर्षावरुन )

२) शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी अभ्यासक्रमांच्या अंमलबजावणीत लवचिकता ठेवावी. (उद्दिष्ट क्र.२ नुसार निष्कर्षावरुन)

- **शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांसाठी शिफारशी**

१) शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांनी आपल्या समस्यांवर तज्ञांकडून मार्गदर्शन व समुपदेशन घ्यावे. (उद्दिष्ट क्र.२ नुसार निष्कर्षावरुन)

## संदर्भ:

Aggarwal J. C. (2007), Essentials of Educational Psychology (2nd Edition) Vikas Publishing

House Pvt. Ltd.
Dutta Gitika (2014), Psychological Aspects of Education, Neelkamal Publications,Hydreabad.
करंदीकर सुरेश, (२०११) शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर
चव्हाण किशोर (२००९), विकास आणि अध्ययनाचे मानसशास्त्र, इनसाईट प्रकाशन, नाशिक
पंडित र.वि. (२००७) शैक्षणिक मानसशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर